अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# कायद्यालाच लांब ठेवणारे नऊ हजार आरोपी

कायद्याचे हात लांब असतात असे आपण नेहमी म्हणत असतो. अनेकवेळेला कायदा आपले अस्तित्व दाखवून इकडे-तिकडे पळणाऱ्या गुन्हेगारांना पकडण्यात यशस्वीही होतो. परंतु पकडलेल्या गुन्हेगाराला सांभाळण्यात किंवा त्यांना शिक्षा करण्यात हाच कायदा अपुरा पडतो याचे ताजे उदाहरण म्हणजे राज्यात वाढत असलेल्या गुन्हेगारीचे प्रमाण आणि त्याच वेळेला पॅरोलवर असलेले तब्बल ९ हजार आरोपी फरार होण्याचा प्रकार घडला आहे. गेल्या २ वर्षांमध्ये या ना त्या कारणाने पॅरोलवर सुटलेले आरोपी पुन्हा परतलेच नाहीत आणि त्यांना परत आणण्यात पोलिसांनीही फारसे कष्ट घेतलेले दिसत नाहीत. साधारणपणे मानवतेच्या दृष्टिकोनातून आणि तितक्याच महत्त्वाच्या कारणासाठी आरोपींना पॅरोलवर सोडले जाते आणि २-३ दिवसांपासून ते १५ दिवसांच्या मुदतीकरिता आरोपीला त्यांच्या घरी किंवा नातेवाईकांकडे जाण्याची मुभा दिली जाते. त्याचवेळेला ती मुदत संपताच त्या आरोपीने पुन्हा कारागृहात स्वत:हून परत यावे, अशी अपेक्षा असते. आरोपींचे गांभिर्य लक्षात घेऊन अनेक आरोपींना मग पोलीस स्वत:च पॅरोलची मुदत संपल्यावर पुन्हा कारागृहात आणतात. मात्र गेल्या २ वर्षांतला अनुभव निराशाजनक आहे. कारण ९ हजार आरोपींनी त्यांना मिळालेल्या पॅरोलचा गैरफायदा घेतला आणि त्यांना फरार घोषित करण्याचे काम पोलिसांनी उरकून घेतले. आता प्रत्यक्ष न्यायालयानेच या फरार आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाला त्याची दखल घ्यावी लागली आणि थोडेथोडके नव्हे तर ९ हजार पॅरोलवरचे आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार होतात ही गोष्ट एकूणच सामाजिकदृष्ट्या आणि कायदा-सुव्यवस्थेच्यादृष्टिने धोकादायक म्हणावी लागेल. कायद्याचे हात लांब असतात ही गोष्ट खरी असली तरी या आरोपींनी कायद्याला आपल्यापासून लांब ठेवण्यात यश मिळविलेले दिसते. या प्रकाराची ज्यावेळी न्यायालय दखल घेते त्यावेळी त्याचे महत्त्व आपोआप सिध्द होते. एकीकडे गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात पोलिसांची संख्या अपुरी पडत आहे. केव्हा, कुठे आणि काय होईल याचा कुणीच भरवसा देऊ शकत नाही. त्यात जर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप असलेले आरोपी पॅरोलच्या निमित्ताने कारागृहाला रामराम ठोकत असतील तर गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊ शकणार नाही. तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न केव्हाही गंभीर होऊ शकतो.

## फरार होण्याचा सोपा मार्ग

आज न्यायालयात हा विषय गेला म्हणून तो समाजासमोर येऊ शकला. अन्यथा सामान्य लोकांपर्यंत ही गोष्ट पोहचू शकली नसती. किती आरोपी पॅरोलवर सुटतात आणि त्यांना परत आणण्यासाठी काय प्रयत्न केले जातात हेदेखील समजू शकले नसते. आज ज्यावेळेला वर्तमानपत्रामधून हा ९ हजार आरोपींचा आकडा प्रसिध्द झाला, त्यावेळेला सामान्य माणसाला निश्‍चित आश्‍चर्याचा धक्का बसला असेल. एक तर गुन्हेगाराला पकडणे मोठे कष्टदायक असते. अनेक प्रकारच्या युक्त्या करून गुन्हे केले जातात. आणि त्यातून आपण सहीसलामत कसे मोकाट राहू असा प्रयत्न गुन्हेगार करतात. एकेका आरोपीला पकडण्याकरिता पोलिसांची स्वतंत्र टीम तयार केली जाते. आरोपी आपल्या जाळ्यात येईल याकरिता पोलिसांना योजना करावी लागते. बऱ्याच परिश्रमानंतर हाती लागलेल्या आरोपींना योग्य ती शिक्षा मिळावी यासाठी पुरावे गोळा करण्यातही पोलिसांचा वेळ जातो. हा सगळा उपद्व्याप केल्यानंतर आरोपीवर खटला दाखल होतो आणि शिक्षा होईपर्यंत त्याची काळजी घ्यावी लागते. एवढेच नव्हे तर शिक्षा झालेल्या आरोपींना तितक्याच बंदोबस्तात ठेवण्याची जोखीम पोलिसांना स्वीकारावी लागते. यापैकी काही आरोपी साधारणपणे वर्ष दोनवर्षांमध्ये काही दिवस पॅरोल मागतात आणि कारागृहाच्या नियमाप्रमाणे तो द्यावाही लागतो. मात्र यासाठी पुरेशी काळजी आणि दक्षताही घ्यावी लागते. त्यामध्ये जर का ढिलाई झाली तर मात्र हेच आरोपी पोलिसांना गुंगारा देतात. तोच प्रकार या ९ हजार आरोपींबाबत घडलेला दिसतो.

## पोलिसांच्या कार्यक्षमतेला आव्हान

सरकारने न्यायालयाच्या या आदेशाची गंभीरपणे अंमलबजावणी करायला हवी. कारण या आरोपींना फरार घोषित केल्यामुळे आपली जबाबदारी संपली असे पोलिसांना वाटले असावे. हाच जर पायंडा पडला तर मग कुठल्यातरी मार्गाने पॅरोल मिळवायचा आणि वर्ष ६ महिन्यांमध्ये सरकारने त्यांना फरार घोषित करायचे. कारागृहातून बाहेर पडण्याचा हा सोपा मार्ग आरोपींच्या हाती लागेल. कायद्याचा कोणताच भाग शिल्लक राहणार नाही आणि त्यातून सुव्यवस्थेचा प्रश्‍नही निर्माण होईल. खरेतर या ९ हजार आरोपींपैकी कोणाला कशा प्रकारच्या शिक्षा झाल्या होत्या, त्यांच्यावर कोणते आरोप होते, हे न्यायालयापुढे आले पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, त्यांना फरार घोषित करण्यापूर्वी पोलिसांनी त्यांना पकडण्याकरिता नेमके काय प्रयत्न केले हेसुध्दा समजले पाहिजे. ९ हजार ही काही छोटी संख्या नाही. म्हणूनच त्याचे महत्त्व सरकारने लक्षात घ्यावे. आजच्या एकूणच अस्थिर परिस्थितीत या आरोपींचा कोणत्याही कामासाठी वापर केला जाऊ शकतो किंवा हेच आरोपी फरार होऊन पुन्हा पूर्वीसारखेच गुन्हे करू शकतात. या सगळ्या शक्यता लक्षात घेऊन कायद्याला आपल्यापासून दूर ठेवणाऱ्या या ९ हजार आरोपींचा कसून शोध घेणे अत्यंत आवश्यक ठरते. शिक्षा न भोगता बाहेर पडण्यात हे आरोपी यशस्वी झाले असले तरी त्याच्या या कारस्थानाला थारा मिळणार नाही याची काळजी पोलिसांनीच घेतली पाहिजे. खरेतर साधारण पाच-पंचवीस आरोपी पॅरोलवर सुटले असतील. आणि त्यातले दहा पाच आरोपी परतले नसतील तर त्यांचा लागलीच कसून शोध घेतला जातो. पण इथे तर ९ हजार आरोपी फरार होतात आणि सरकार काहीच करत नाही ही गोष्ट आश्‍चर्यकारकच ठरते. न्यायालयाला याबाबतीत कठोर भूमिका घ्यावी लागेल. आता त्याबाबत तसे प्रयत्नही करणे गरजेचे ठरणार आहे. या नऊ हजारापैकी कितीजण हाताशी लागतात यावर पोलिसांची कार्यक्षमता आणि यश अवलंबून आहे. निम्मे आरोपी जरी सापडले तरी पोलिसांनी आपली कार्यक्षमता सिध्द केली असे म्हणता येईल.